# सूरपारंब्या

शिरीष कणेकर

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**सूरपारंब्या**
शिरीष कणेकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
शिरीष कणेकर
ए/३४, भाटिया बिल्डिंग, ले. दिलीप गुप्ते मार्ग,
माहीम, मुंबई- ४०० ०१६
फोन नं. : ४४६३२२४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३२०/-

माझं अवाक्षरही न वाचणारा माझा मुलगा
डॉ. अमर यास...

# मनोगत

'सूरपारंब्या' हा आजवरच्या माझ्या स्तंभलेखनाच्या कारकीर्दीतील सर्वोच्च मानबिंदू आहे, अशी माझी भावना आहे. तशी मी आजपर्यंत अठरा सदरं लिहिलीत. एक इंग्रजीतून. एकट्या 'लोकसत्ते'तच मी सहा सदरं लिहिलीत. हा 'लिमका बुका'त जाऊ शकेल असा विक्रम असावा. वाचकांनी मला फार काळ सहन केलंय. त्यामुळे मराठी माणसाच्या सहनशक्तीविषयी कोणाचं काहीही मत असो, मला कृतज्ञतापूर्वक आदर आहे. 'यादों की बारात' हे दोन हप्त्यात प्रसिद्ध झालेले प्रदीर्घ सदर माझे कदाचित सर्वात गाजलेले सदर असू शकेल. 'चहाटळकी' हे 'रविवारच्या लोकसत्ते'तून सलग पंचाहत्तर आठवडे चाललेले सदर मला ललित लेखक म्हणून मान्यता मिळवून देणारे ठरले असेल. 'चिमटे आणि गालगुच्चे' किंवा त्याचेच जुळे भावंड 'गुद्दे आणि गुदगुल्या' ही कुरकुरीत वेफर्ससमान सदरे लिहिण्यात माझा व (कदाचित) वाचकांचाही चांगला टाईमपास झाला असेल. विषयातील विविधतेमुळे व मांडणीतील प्रयोगामुळे 'सामना'तील 'कणेकरी'ने मला बहुत आनंद दिला असेल; परंतु 'सूरपारंब्यांची गोष्टच वेगळी होती. हा रविवार सोडून रोजच्या रोज लिहायचा स्तंभ होता. रोज घालायचा रतीब. तो रतीब वाटता कामा नये ही सदराची प्रमुख अपेक्षा होती. तो प्रसन्न असावा एवढीच संपादकांची अपेक्षा होती. एखादी कोपरखळी त्यांच्या मते पुरेशी होती. माझं कोपर (आणि मी) देवानं केवळ एक कोपरखळी मारण्यासाठी जन्माला घातलेलं नव्हतं. स्तंभ ताज्या बोंबलासारखा हवा अशी माझीच माझ्याकडून मागणी होती.

विजय तेंडुलकर, चिं. त्रं. खानोलकर, शं. ना. नवरे, व्यंकटेश माडगूळकर या साहित्यशुण्डांनी वृत्तपत्रातून दैनिक सदर लिहिले होते. या पंक्तीत मी बसतो का व बसत असल्यास कुठे बसतो मला कळत नव्हते. एकशे सदतीस लेख लिहून

सदर थांबल्यावर आजही मला माझे नेमके स्थान कळलेले नाही. साहित्यसागरात माझ्याकडून चमचाभर तरी भर पडली का मला माहीत नाही. या रोजच्या भेटीमुळे मी अधिक वाचकाभिमुख होऊन त्यांच्याशी अधिक जवळीक व सुसंवाद साधू शकलो का हेदेखील मी सांगू शकणार नाही.

स्तंभ चालू होता ते सहा महिने मी पूर्णपणे 'सदर'मय जीवन जगलो. माझ्या ध्यानीमनी हा स्तंभ असायचा. त्यासाठी मी अमेरिकावारी दोन महिने पुढे ढकलली. 'आधी लगीन कोंडाण्याचं मग रायबाचं.' असं म्हणणाऱ्या तानाजीप्रमाणे 'सेन्स ऑफ पर्पज अँड प्रायॉरिटी' दाखवीत 'आधी निष्ठा सूरपारंब्यांशी, मग ओढ फारीनची' असा मी विचार केला व कृतीत आणला.

रोज वाचनीय मजकूर लिहिणे अत्यंत कठीण असल्याचे सगळेच सांगत होते. रोजच्या रोज लिहिणे मला तरी मुळीच कठीण गेलं नाही. (वाचनीयतेचं मी काय सांगू) कधीही विषयांचा तुटवडा भासला नाही. गळ्यापर्यंत आलंय नि काहीच सुचत नाही असं कधीच झालं नाही. सुरुवातीपासूनच मी बारा-पंधरा जादा लेख तयार ठेवले व हा 'बँक बॅलन्स'चा आकडा कायम ठेवला. म्हणून तर मी अमेरिकेला निघून गेल्यावर महिनाभर माझं सदर सुरळीतपणे चालू राहू शकलं. ताजा विषय समोर आला की, तो मजकूर मी आधी घ्यायला सांगायचो. ते घ्यायचे. आजारपण, कार्यक्रमांचे दौरे व अन्य व्याप मी माझ्या मार्गात आड येऊ दिले नाहीत. कुवेतला जाताना 'इमिग्रेशन' ऑफिसरने माझ्या पासपोर्टवर शिक्का मारता मारता मान वर न करता मला विचारले, ''मग आता 'सूरपारंब्या' कोण लिहिणार?'' कुवेतला उतरल्याबरोबर महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांनी हाच प्रश्न विचारला तेव्हा मी भारावलो. 'लोकसत्ता'चीही 'पहुँच'कुठपर्यंत आहे हे पुन्हा एकदा नव्याने कळले. त्या 'लोकसत्ता'तून तीस वर्षे सातत्याने लिहिल्यावर त्याची रसाळ गोमटी फळे माझ्या झोळीत पडणे स्वाभाविकच होते. वृतपत्राच्या लोकप्रियतेला आम्ही आपली वैयक्तिक लोकप्रियता समजण्याची घोडचूक करतो हा भाग वेगळा.

'सूरपारंब्या' हे सदराचं नाव मी विचारपूर्वक निवडलं होतं. काहीतरी विनोदी नाव घेऊन मला वाचकांची दिशाभूल करायची नव्हती, अगोदरच त्यांची मनोभूमिका तयार करायची नव्हती व स्वत: बंधन घालून अकारण स्वत:ला जखडून घ्यायचं

नव्हतं. निखळ विनोदाबरोबर इतर अनेक विषय मी सदरात घेऊ शकलो. मला नेहमीच खूप काही सांगावंसं वाटत आलंय. गमतीने, त्वेषाने, उमाळ्याने! माझी मतं, विचार व भावना व्यक्त करण्यासाठी 'सूरपारंब्या'ने मला तगडं व्यासपीठ दिलं. मी कृतज्ञ आहे. माझा शेवटचा दीस गोड झाल्यावर कोणीतरी असं म्हणावं –'जमाना बडे शौक से पढ रहा था, तुमही सो गये दास्ताँ कहेते कहेते...'

**– शिरीष कणेकर**

माझा मुलगा अमर हिंदुजा हॉस्पिटलात डॉक्टर आहे. एके दिवशी तो विचारीत आला, ''पपा, 'आंबा प्रारंभ' म्हणजे काय?

''आंब्याच्या सीझनची सुरुवात असा काहीतरी अर्थ असू शकेल.''

''तुमचा त्याच्याशी काय संबंध?''

''काहीच नाही.''

''मग आमची टेक्निशियन काय म्हणत होती, की तुम्ही 'आंबा प्रारंभ' म्हणून रोज काहीतरी लिहीत असता?''

''आंबा प्रारंभ नाही रे बाबा, सूरपारंब्या.''

''ते काय वेगळं असतं का?''

मी शांतपणे उठलो व आंबा प्रारंभ- आपलं, सूरपारंब्या लिहायला बसलो.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुलाखत | .......................... | १५ |
| २. | पन्नालाल | .......................... | १८ |
| ३. | केनेडीचा केस | .......................... | २० |
| ४. | से चपाती | .......................... | २२ |
| ५. | बडदास्त | .......................... | २४ |
| ६. | पोपटपंची | .......................... | २६ |
| ७. | सुलूची आई | .......................... | २८ |
| ८. | संशोधन | .......................... | ३० |
| ९. | खंत | .......................... | ३२ |
| १०. | अण्णा | .......................... | ३५ |
| ११. | डास पुराण | .......................... | ३७ |
| १२. | फेथ हिलर | .......................... | ३९ |
| १३. | विवाहित नटी | .......................... | ४१ |
| १४. | प्रश्न प्रश्न | .......................... | ४३ |
| १५. | ध्रुवीकरण | .......................... | ४५ |
| १६. | कुवेत | .......................... | ४७ |
| १७. | चालूगोपाळ | .......................... | ४९ |
| १८. | पोराय नमः | .......................... | ५१ |
| १९. | ती | .......................... | ५३ |
| २०. | चांगला चित्रपट-एक | .......................... | ५५ |
| २१. | चांगला चित्रपट-दोन | .......................... | ५७ |
| २२. | चांगला चित्रपट-तीन | .......................... | ५९ |
| २३. | बाईलवेडा | .......................... | ६१ |
| २४. | क्लिंटनमेनिया | .......................... | ६४ |
| २५. | पाकिस्तानी प्रेम | .......................... | ६६ |

२६. नामकरण ........................... ६८
२७. दंतवैद्य ........................... ७०
२८. चौकशी ........................... ७२
२९. खटला ........................... ७४
३०. लालू-राबडी ........................... ७६
३१. बहुप्रसवा ........................... ७८
३२. शाकाहारी ........................... ८०
३३. अपशब्द ........................... ८२
३४. संपादक ........................... ८४
३५. टेस्टस् ........................... ८७
३६. नेलपेंट ........................... ८९
३७. पोरखेळ ........................... ९१
३८. चतुष्पाद पुत्र ........................... ९३
३९. पंतप्रधानाचं बाळंतपण ........................... ९५
४०. सोफिया लॉरेन ........................... ९७
४१. बाप ........................... ९९
४२. सर्वात वाईट फलंदाज ........................... १०१
४३. हिट् की फ्लॉप ........................... १०३
४४. चॅपेलशी गुफ्तगू ........................... १०५
४५. सर्व्हे ........................... १०७
४६. पप्पू ........................... १०९
४७. पत्रकारिता ........................... १११
४८. बाहुली ........................... ११३
४९. वेगळा ........................... ११५
५०. वेळ नाही ........................... ११७
५१. गुत्ता ........................... ११९
५२. पुणेरी ........................... १२१
५३. सौंदर्यस्पर्धा ........................... १२३
५४. ब्रह्मचर्यपालन ........................... १२५